# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

# निवडणूक- २०१७

## मा. कुलगुरू महोदयांचे अपीलांसंदर्भात सुधारित आदेश

विविध संघटना, तसेच इतर प्राध्यापकांनी केलेल्या अपील अर्जानुषंगाने मा. कुलगुरू तथा निवडणूक अपील अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्याकडून खालील सुधारित निर्देश देण्यात येत आहेत.

सर्व प्राधिकरणांसाठी (प्राचार्य, व्यवस्थापनाचे प्रतिनिधी, अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, अभ्यासमंडळ) जाहीर केलेल्या दुरुस्त मतदार याद्यांमध्ये (Corrected Electoral Roll) खालील निकषाधारे निर्णय घेण्यात आले आहेत.

i. उपरोल्लेखित सर्व निर्वाचक गणांमध्ये ज्या अर्जदारांनी तदर्थ (Ad-hoc) मान्यतापत्र जोडलेले आहे, परंतु सेवासातत्य आदेश काही कारणास्तव जोडावयाचा राहून गेलेला आहे, अशा सर्वांसाठी अपील करताना जर त्यांनी परिविक्षाधीन कालावधीचे ओदश किंवा सेवासातत्य आदेश वा कॅसच्या ऑर्डर्स अपील अर्जासोबत विहित मुदतीत जोडल्यास, त्यांचे अर्ज वैध करण्यात येतील.

ii. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाशी संलग्नित झालेल्या सर्व महाविद्यालयाशी संबंधितांचे उपरोल्लेखित निर्वाचक गणासाठी प्राप्त झालेले अर्जापैकी, ज्या अर्जावर BATU-INVALID असे यादीत दर्शविले आहे, असे सर्व अर्ज वैध मानण्यात येत आहेत.

iii. 'विद्यापीठ अध्यापक' गटासाठी प्राप्त अर्जातील अर्जदारांनी अपील करताना जर त्यांचे परिविक्षाधीन नमूद असलेले आदेश (Probation period order) आणि सेवासातत्य नमूद असलेले आदेश अपीलासोबत जोडल्यास, अशा सर्व अर्जदारांचे अर्ज वैध ठरविण्यात येतील.

iv. अर्जदाराची स्वाक्षरी, सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी, सक्षम प्राधिकाऱ्याचा शिक्का नसलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

v. 'व्यवस्थापनाचे प्रतिनिधी' या गणासाठी ज्या अर्जदारांचे प्रकरण न्यायप्रविष्ट असेल किंवा धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असेल किंवा धर्मादाय आयुक्तांचे रीतसर पत्र नसलेले अर्ज अवैध ठरविण्यात येतील.

vi. तात्पुरती नियुक्तीचे आदेश, तासिका तत्त्वावरील नियुक्तीचे आदेश ग्राह्य धरले जाणार नाहीत.

Bachopade
17/10/2017

**मा. कुलगुरू तथा**
**अपिलीय अधिकारी**

दिनांक:- १७-१०-२०१७